उद्योग ऊर्जा व कामगार विभाग

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ दिनांक ३० जानेवारी, २०१०

## अधिसूचना

मुंबई विद्युत शुल्क अधिनियम, १९५८.

क्रमांक इएलडी २००८/प्र.क्र.८०/ऊर्जा-१ - मुंबई विद्युत शुल्क अधिनियम, १९५८(१९५८ चा मुंबई ४०) याच्या कलम ३ च्या पोट-कलम (१) तसेच अनुसूचीतील भाग अ, ब, क, फ आणि ग अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि या संदर्भात त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन आणि शासन अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक इएलडी २००३/सीआर ५२/ऊर्जा-२, दिनांक ३१ मार्च, २००३ चे अतिक्रमण करुन महाराष्ट्र शासन याव्दारे फेब्रुवारी, २०१० या बिलींग महिन्यापासून या सोबतच्या सारणीच्या (टेबल) स्तंभ (२) येथे नमूद केलेल्या वीज वापरासाठी उक्त सारणीच्या (टेबल) स्तंभ (३) येथे नमूद केलेले विद्युत शुल्काचे दर विनिर्दिष्ट करीत आहे.

### सारणी (टेबल)

| अनुक्रमांक | वीज वापरासाठी अधिनियमाच्या परिशिष्टातील लागू असलेला भाग | विद्युत शुल्काचे दर |
|---|---|---|
| | | (३) |
| (१) | (२) | |
| | भाग अ | वापर आकाराच्या पंधरा टक्के |
| १ | भाग ब | वापर आकाराच्या सतरा टक्के |
| २ | भाग क | वापर आकाराच्या दहा टक्के |
| ३ | भाग फ | वापर आकाराच्या नऊ टक्के |
| ४ | भाग ग | तीस पैसे प्रति युनिट |
| ५ | | |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(सुब्रत रथो)
सचिव (ऊर्जा)